
NEHRU BAL PUSTAKALAYA

# बेगम गुलाबो मावशी आणि तिचे फुगे

क्वादसिया झैदी

अनुवाद

मुकुंद टाकसाळे



चित्रे

निरेन सेन गुप्ता



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 81-237-3526-X


2001 *(शके 1923)*
मूळ © बच्चोंका आदाबी ट्रस्ट, 1992
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2001
**रु. 11.00**
**Begum Gulabo Mousie and Her Balloons *(Marathi)***
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली 110 016 यांनी प्रकाशित केले.


नेहरू बाल पुस्तकालय

# बेगम गुलाबो मावशी आणि तिचे फुगे


क्वादसिया झैदी

अनुवाद : मुकुंद टाकसाळे
चित्रे : निरेन सेन गुप्ता





बेगम गुलाबो मावशी ही मोठी चटपटीत बाई होती. गावाबाहेरच्या जुन्या पुराण्या आंब्याच्या झाडाच्या मुळाशी तिने आपले दुकान थाटले होते. तिथे ती छान छान खाऊ आणि खेळणी विकायची.







दुकानात नीट रांगेत खाऊच्या बरण्या लावून ठेवलेल्या होत्या. कोपऱ्यातल्या एका टेबलावर निरनिराळी खेळणी व्यवस्थित मांडून ठेवली होती. मोठ्या बायकांसाठी त्यांच्या आवडीच्या काही वस्तू होत्या. उदाहरणार्थ—सुया, दोऱ्यांची रिळे, बटणे, झालरी, हूक वगैरे.

शेजारी राहणाऱ्या सगळ्या आयाबाया काहीही लागले सवरले तरी थेट बेगम गुलाबोचे दुकान गाठायच्या.





पावसाळा संपल्यावर गुलाबो मावशी बाजाराच्या गावाला जायला निघाली. तिने लाल घागऱ्यावर फुलाफुलांचा कुडता चढवला आणि वर पिवळी ओढणी घेतली. हातात एक मोठ्ठी पिशवी घेतली आणि ती निघाली बाजाराला.

तेवढ्यात भुरेमियाँची गाडी आली. ती गाडीत चढली आणि गाडी बाजाराच्या गावाला निघाली. भुरेमियाँ हा जात्याच दयाळू. रस्त्यावर



कुणीही मित्र दिसला की त्याला तो गाडीत बोलवायचा. त्याचा परिणाम असा झाला की बाजाराच्या गावाला जाईपर्यंत गाडीत खूपच दाटी झाली. त्यांच्यापैकी काहीजण बाजाराला खरेदीसाठी निघाले होते तर काहींना आपल्याजवळील माल विकायचा होता. कुणी विकण्यासाठी आपल्याबरोबर तिळगुळाचे लाडू घेतलेले होते तर कुणी नुसता गूळच विकायला आणलेला होता. कुणी मातीची छोटी छोटी खेळणी विकायला आणलेली होती.








बाजाराचा गाव आल्याबरोबर बेगम गुलाबो मावशीने गाडीबाहेर उडी मारली. तिने पटापट खरेदी सुरू केली. तिची सगळ्या दुकानदारांबरोबर चांगली ओळख होती. त्यांच्याशी घरगुती गप्पा मारता मारता तिची खरेदी चालू होती.





गुलाबो मावशीने तिला हवी ती सारी खरेदी केली. तिची पिशवी अगदी भरून गेली. ती आता गाडीकडे निघाली एवढ्यात तिचे लक्ष एका दुकानातल्या फुग्यांकडे गेले. ती मनाशी म्हणाली, ''हे तर घ्यायलाच हवेत. गावाकडल्या मुलांना हे फुगे खूप आवडतील. फुगे विकत घेण्यासाठी ते माझ्या दुकानात नक्की येतील.''



मग गुलाबो मावशीने एकेका रंगाचे दोन दोन फुगे खरेदी केले आणि ती गाडीत चढली. गाडी सुरू झाल्याबरोबर फुगे वर उडू लागले. गाडीतल्या सर्वांनाच त्या फुग्यांची गंमत वाटत होती.

दिवसभराच्या कष्टाने आता गुलाबो मावशी थकलेली होती. त्यामुळे





घरी पोहोचल्यावर बाकी काही करण्यापूर्वी पहिल्यांदा तिने आपला मोर्चा स्वैपाकघराकडे वळवला आणि स्वतःसाठी झकास गरमागरम चहा करून घेतला. चहाने तरतरी आल्यावर ती दुकानात गेली आणि कामाला लागली. खरेदी केलेल्या नव्या वस्तूंची तिने फडताळावर मांडामांड सुरू केली.




हे काम ती एकीकडे करत असतानाच तिच्या कानावर कसली तरी खुडबुड ऐकू आली. कुणी तरी कशावर तरी नखाने ओरखडावे तसा अगदी बारीक आवाज.

"कसला बरं म्हणायचा हा आवाज?" गुलाबो मावशी स्वतःशीच पुटपुटली. "बहुधा दुकानात एखादी गांधीलमाशी अडकलेली असावी आणि ती बाहेर जाण्यासाठी रस्ता शोधत असावी." तिने फडताळातल्या साऱ्या बरण्यांच्या आणि खोक्यांच्या मागे पाहिले. सगळी खेळणी काढून पाहिली. पण तिला काही तो आवाज कशाचा आहे ते समजले नाही. नव्या वस्तू फडताळात ती लावत असताना नखाने ओरखडण्याचा बारीक आवाज मागे चालूच होता.



साऱ्या वस्तू फडताळात लावून झाल्या. आता पाळी फुग्यांची. तिला ते फुगे खिडकीशी टांगून ठेवायचे होते. बाहेरून मुलांना सहजी दिसतील असे. ते फुगे पाहिल्यावर मुले घरी धावत सुटतील आणि आपल्या आयांचा त्या फुग्यांसाठी पिच्छा पुरवतील, हे तिला चांगले ठाऊक होते.



गुलाबो मावशी फुग्यांची दोरी सोडत असतानाच तिच्या कानावर बारीक आवाज आला, "मला बाहेर काढा नं. खरंच मला बाहेर यायचंय."

"अरेच्चा! हा आवाज तर फुग्यातून येतो आहे," ती स्वतःशीच म्हणाली. तिने फुग्याला कान लावला. तो आवाज खरोखरच एका लाल फुग्यातून येत होता.

गुलाबो मावशी धावतच आत गेली आणि सुई घेऊन आली. तिने सुई फुग्याला लावली. तो फुगा मोठ्ठा आवाज करून फुटला. हिरव्या कपड्यातला एक बुटका त्यातून बाहेर पडला. त्या छोट्याला छोटे छोटे पंखपण होते. छोट्या नम्रपणे म्हणाला, "मला फुग्यातून मुक्त केलंत त्याबद्दल तुमचे आभार. थँक यू." गुलाबो मावशी आश्चर्यचकित झाली. "अरे! कोण तू आणि या फुग्यात कसा काय अडकलास?"




छोट्या उत्तरला, "मी सूर्याच्या किरणामध्ये राहतो. आम्हाला किनई खेळण्याच्या दुकानात जायचं होतं. म्हणून आज सकाळी मी माझ्या मित्राबरोबर किरणांना शिडी लावून खाली उतरलो. आम्ही दोघं नंतर लपाछपी खेळू लागलो. जिथे जिथे म्हणून लपता येईल तिथे तिथे आम्ही लपायचो. खेळता खेळता मी लपलो लाल फुग्यात. मी आत असतानाच कुणी तरी आलं आणि त्यानं त्यात हवा भरली. नंतर फुग्याचं तोंड दोऱ्यानं बांधून टाकलं. सुरुवातीला मला वाटलं, हा फुगा फोडून आपण सहज बाहेर येऊ आणि संध्याकाळ व्हायच्या आत सूर्याच्या किरणावरील माझ्या घरी परत जाऊ. पण आता काय करावं मला काहीही सूचत नाही. माझी शिडी राहिली आहे त्या खेळण्याच्या दुकानात. त्यामुळे मला सूर्य किरणावर चढताच येत नाही. आता मी घरी कसा जाऊ?"

"काही काळजी करू नकोस," गुलाबो मावशी त्याला प्रेमाने म्हणाली, "आता रात्र खूप झाली. आता निवांत झोप इथंच. उद्या सकाळी मी तुला त्या खेळण्याच्या दुकानात घेऊन जाईन. तिथे तुला तुझी शिडी सापडेल. त्या शिडीवरून मग तू सूर्य किरणावर चढशील आणि आपल्या घरावर परत जाशील."

गुलाबो मावशीने त्याला एका रिकाम्या साबणाच्या घरात त्याचे अंथरूण टाकून दिले. त्याला छोटी उशी दिली. त्या उबदार बिछान्यावर त्याच्यासाठी मऊ मऊ पांघरुणाची सोय केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून गुलाबो मावशी स्वैपाकघरात कामाला लागली तरी हा छोट्या शांतपणे झोपलेला होता. तिने खिडकी उघडली. सूर्याचा एक किरण आत आला आणि छोट्या जागा झाला. "नमस्ते, गुलाबो मावशी," तो म्हणाला. त्यावर गुलाबो मावशी म्हणाली, "नमस्ते छोट्या. आता तू जाण्यापूर्वी मी तुझ्यासाठी छानसा नाश्ता बनवते. काय हवं सांग बरं तुला नाश्त्याला?"

"नेहमी नाश्त्यासाठी मी दवाचा बिंदू टिपून घेतो," छोट्या म्हणाला. "पण आज मात्र तू देशील तो नाश्ता मला चालेल."



गुलाबो मावशीने त्याला एका छोट्या कपात दुधात पावाचे तुकडे कुसकरून दिले. त्याला छोटासा चमचाही खाण्यासाठी म्हणून दिला.

त्यांचा हा नाश्ता चालू असतानाच दुकानात चिऊताई गॉगल खरेदी करण्यासाठी आल्या. "गुलाबो मावशी, कोण हो हा पाहुणा?" चिऊताईने विचारले. गुलाबो मावशीने तिला लाल फुग्याची गोष्ट ऐकवली.

"माझा चुलतभाऊ चिमणेदादा बाजाराच्या गावाहून माझ्याकडे पाहुणा म्हणून आलेला आहे. तो आजच त्याच्या गावी परत जाणार आहे. मी या छोट्याला आपल्या बरोबर घेऊन जायला त्याला सांगीन."









“हे तर फारच छान झालं,” गुलाबो मावशी म्हणाली. छोट्याही हे ऐकून आनंदाने नाचू लागला. चिऊताई चिमणेदादाला घेऊन यायला निघाली. छोट्या दुकानात इकडे तिकडे भिरभिरत्या नजरेने पाहत होता. “तुला यातली कुठली वस्तू आवडली? जी आवडली असेल ती घेऊन जा.”


सगळ्याच वस्तू एवढ्या छान होत्या की त्यापैकी एकच वस्तू निवडणे छोट्याला कठीण जात होते. अखेर त्याने एका छोट्या ढोलाची निवड केली.




तेवढ्यात चिमणेदादाला घेऊन चिऊताई आली. गुलाबो मावशीने छोट्याला हळूच चिमणेदादाच्या पाठीवर ठेवले.

"टाटा छोट्या," ती म्हणाली, "मला विसरू नकोस. आणि पुन्हा मला भेटायला ये."

छोट्याने गुलाबो मावशीला परत येण्याचे कबूल केले आणि चिमणेदादाने हवेत झेप घेतली. चिमणेदादाच्या पाठीवर बसलेला छोट्या तिच्या दृष्टीआड होईपर्यंत तिच्याकडे पाहून आपला छोटासा रुमाल हलवत होता.



Lasertypeset at Ess Ess Enterprises, New Delhi-110 055
and printed at Impress Offset, Noida (U.P.)




रु. 11.00

ISBN 81-237-3526-X

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया